डॉ नागपूर ,दीक्षाभूमी , कॉलेज आंबेडकर.

# अहवाल

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जल आणि उर्जा विकासातील योगदान

डॉ.आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस) विभाग, डॉ.आंबेडकर विचारधारा विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी)नागपूरयांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन चर्चासत्र दिनांक :-२५ मे २०२१ वेळ :- दुपारी १.०० वाजता " डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जल आणि उर्जा विकासातील योगदान" या विषयावर एक दिवसीय व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून सु-प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ.प्रदीप आगलावे प्रमुख वक्ते लातूर येथील विचारवंत प्रा.डॉ.श्रीकांत गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज च्या प्राचार्या डॉ.बी.ए.मेहेरे होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे,सूत्रसंचालन डॉ.आंबेडकर आंबेडकर विचारधारा विभागाचे विभाग प्रमुख प्रा.राहुल मून, आभार बार्टीच्या समतादूत श्रीमती शारदा माकोडे यांनी केले.या कार्यक्रमात १७२ प्रेक्षकाची उपस्थिती होती.







म टा नागपूर । शुक्रवार, २१ मे २०२१

**'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल-ऊर्जा विकासातील योगदान' चर्चासत्र २५ला**

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या वतीने मंगळवार, २५ मे रोजी दुपारी एक वाजता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जल आणि ऊर्जा विकासातील योगदान' विषयावर ऑनलाइन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या चर्चासत्राचे उद्घाटन विचारवंत डॉ. प्रदीप आगलावे यांच्या हस्ते होईल. कॉलेजच्या प्राचार्य डॉ. बी. ए. मेहेरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या चर्चासत्रात प्रमुख वक्ते म्हणून लातूर येथील साहित्यिक डॉ. श्रीकांत गायकवाड सहभागी होतील. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे करतील, तर प्रा. राहून मून हे भूमिका मांडतील. बार्टीच्या समतादूत शारदा माकोडे आभार मानतील. अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिकांनी झूम ॲपवरून होणाऱ्या या विशेष ऑनलाइन चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.




# डॉ.आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग (एन एस एस )
डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग
आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) नागपूर
यांच्या संयुक्त विद्यमाने

## प्रमाणपत्र

प्रा. / डॉ. ------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------ यांनी
दिनांक २५/५/२०२१ रोजी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जल आणि उर्जा विकासातील योगदान" या विषयावरील व्याखानात सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| डॉ.रवींद्र तिरपुडे | प्रा.राहुल मून | डॉ. बी. ए. मेहेरे |
| कार्यक्रम अधिकारी (रा.से.यो.) | विभाग प्रमुख (आंबेडकर विचारधारा) | प्राचार्या |




म टा नागपूर । गुरुवार, २७ मे २०२१

# विज्ञान, मानवता मिलाप म्हणजे बौद्धधम्म

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

'अडीच हजार वर्षापूर्वी बुद्धाने सांगितलेला विचार हा वर्तमान काळातही तेवढ्याच प्रमाणात मानवी जीवनाला समृद्ध करण्यासाठी लागू पडतो. बुद्धाच्या शिकवणीत समता, स्वातंत्र्य आणि मानवतेची बीजे अहेत. त्या बिजांचे प्रत्यारोपण झाल्यास संपूर्ण विश्वातील मानव सुखी होईल. विज्ञान आणि मानवतेचा विचार अधिक मोठ्या प्रमाणात स्वीकारण्याची आवश्यकता आहे. आणि खऱ्या अर्थाने मानवतेची सेवा करून बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करण्याचे काम आजच्या तरुण पीढीचे आहे. बौद्ध साहित्याचा अभ्यास करून तरुणांनी सक्षम होण्याची गरज आहे', असे प्रतिपादन विचारवंत प्रा.डॉ. प्रदीप आगलावे यांनी केले.

### व्याख्यानमालेत डॉ. प्रदीप आगलावे यांचे प्रतिपादन

दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, नागपूरतर्फे आयोजित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जल व उर्जाक्षेत्रातील योगदान' विषयावरील ऑनलाइन व्याख्यानमालेचे उद्घाटक म्हणून डॉ. प्रदीप आगलावे बोलत होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. बी. ए. मेहरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या व्याख्यानमालेत प्रमुख वक्ता म्हणून लातूर येथील डॉ. श्रीकांत गायकवाड सहभागी झाले होते. डॉ. गायकवाड म्हणाले, 'सृष्टीचा पालन पोषणकर्ता शेतकरी आहे आणि त्यांच्या प्रश्नाकडे फारसे लक्ष कुणाचे गेले नाही. डॉ. आंबेडकरांनी पाणी आणि ऊर्जाक्षेत्राबाबत मांडलेल्या विचारांचा अंगिकार झाल्यास शेतकऱ्याचे प्रश्न मार्गी लागण्यास उशीर लागणार नाही. देशातील धरण निर्मितीत डॉ. आंबेडकरांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांचे विचार भावनिक करून चालणार नाहीत, तर ते विचार कार्यान्वीत झाल्यास देशाला नवी दिशा व मार्ग सापडेल. एकूण सामाजिक जीवनातील त्यांचे कर्तृत्व फार मोठे आहे', असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. बी. ए. मेहरे यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल माहिती दिली. डॉ. आंबेडकरांची धम्मक्रांती ही बुद्धाने केलेल्या धम्मक्रांतीचेच रूप असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्तविकात डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कुशाग्र बुद्धीचे मोजमाप करणारे यंत्रच तयार झाले नसल्याचे, त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख प्रा. राहूल मून यांनी केले, तर आभार बार्टीच्या समतादूत साधना माकोडे यांनी मानले.



ऑनलाइन व्याख्यानमालेत बोलताना विचारवंत डॉ. प्रदीप आगलावे. व्याख्यानमालेत सहभागी डॉ. श्रीकांत गायकवाड, डॉ. रवींद्र तिरपुडे आदी.